ePaper

## हिंजवडी आयटी पार्कमध्ये कामगारांची बस पेटली;चार कामगारांचा होरपळून मृत्यु


| वर्ष - 8 | अंक - 241 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज ™


### आतील पानांत


- नियम काही एका रात्रीत केलेला नाही!
- आर्यन खानला तुरुंगात सिगारेट दिली
- नागपूर हिंसाचार पूर्वनियोजित होता!
- विल्यम्स यांचे पृथ्वीवर सुरक्षित 'लॅंडींग'!



www.mahaenews.com | गुरुवार, दि. 20 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### फोटोसह तक्रार करायला गेलेल्या विद्यार्थिनीची दखलही नाही

# पुणे विद्यापीठात 'लेडीज होस्टेल' मध्ये दारुच्या बाटल्या... सिगरेटची पाकिटे !

## शिक्षणाच्या नावाखाली काय चाललंय राव? पालकांमध्ये काळजीचे वातावरण

### महिला अधिकाऱ्यांचा कानाडोळा !

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**शिक्षणाची गंगोत्री किंवा शिक्षणाचे माहेरघर समजल्या गेलेल्या पुण्यात काय चाललंय हे अत्यंत चिंतेने विचारण्याची वेळ आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मुलींच्या हॉस्टेलमध्ये दारुच्या बाटल्या अन् सिगारेटच्या पाकिटांचा मोठा ढीग सापडला आहे. फोटोसह मुलीने केलेल्या तक्रारीला तेथील महिला अधिकाऱ्याने केराची टोपली दाखवली असून या प्रकरणाकडे कानाडोळा केला आहे.**



### 'अभाविप' आक्रमक..गैरप्रकार निपटून काढणार:अमित ठक्कर

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील या गैरप्रकारांच्या विरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने वेळोवेळी आंदोलने केली आहेतच. न्याय मिळत नाही तोपर्यंत ती सुरूच राहतील, असे उद्गार 'अभाविप' चे महाराष्ट्र आणि गोव्याचे प्रदेश संघटनमंत्री अमित ठक्कर यांनी काढले. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे, चांगली संस्कार मिळावेत ही भूमिका आम्ही नेहमीच अंगीकारली आहे. देश सुसंस्कृत आणि सत्शील व्हावा, यासाठी अभाविपचा नेहमीच पुढाकार असतो. पुणे विद्यापीठाचा मुद्दा आम्ही ऐरणीवर घेतला असून वेगवेगळ्या पद्धतीने प्रशासनाला जाग आणून हे गैरप्रकार बंद करण्यास भाग पाडू, असे ते म्हणाले.

### ही म्हणे शिक्षणाची पंढरी..

महाराष्ट्रातील शिक्षणाची पंढरी असलेल्या पुणे शहरामध्ये लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनी आपल्या भविष्याची स्वप्ने घेऊन येतात. शहरातील अनेक संस्था या विद्यार्थ्यांचं भवितव्य घडवतात, त्यांच्या आयुष्याला दिशा अन् कलाटणी देतात, पण या शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी घटना पुणे विद्यापीठात घडली आहे.

### चर्चेच्या अग्रस्थानी पुणे विद्यापीठ

पुण्यात एकूण १७ ते १८ विद्यापीठे आहेत. या शिक्षणसंस्थांपैकीच एक सर्वात नामवंत शिक्षणसंस्था म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ! मात्र, सध्या पुण्यातील हे नामवंत विद्यापीठ वेगळ्याच कारणाने चर्चेत आले आहे. मुलींच्या हॉस्टेलमध्ये जे गैरप्रकार चालतात तो चर्चेचा विषय झाला आहे.

### दारुच्या बाटल्या आणि सिगरेटची पाकिटे..

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील मुलींच्या वसतिगृहात दारूच्या बाटल्या आणि सिगरेटची पाकिटे सापडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या दारूच्या बाटल्या आणि सिगरेटच्या पाकिटांच्या ढिगाऱ्याचे फोटो आणि व्हीडिओ समोर आले आहेत, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

### प्रयोगशाळा नव्हे; रोमँटिक अड्डे !

पुणे विद्यापीठातील अनेक प्रयोगशाळा या 'रोमँटिक' बनल्या असल्याचा गौप्यस्फोट एका विद्यार्थ्याने केला. नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर त्याने सांगितले, की प्रयोग शाळांच्या किल्ल्या विद्यार्थ्यांकडे असतात. रात्रभर प्रयोग करायचे म्हणून या प्रयोगशाळांचा वापर होतो. पण, त्या ठिकाणी रोमँटिक अड्डे बनले आहेत. कुलगुरू आणि कुलसचिवांच्याकडे आम्ही तक्रारी दिल्या असल्याचेही त्याने सांगितले.

प्रशासन ढिम्म, कारवाईच नाही !

मुलींच्या या वसतिगृहात वास्तव करत असलेल्या एका विद्यार्थीनीने या सर्व गैरप्रकारची माहिती वसतिगृह महिला अधिकारी यांच्याकडे वारंवार केली होती. परंतु, संबंधित महिला अधिकाऱ्यांनी कोणती कारवाई केली नाही. त्यानंतर संबंधित विद्यार्थीनीने प्रभारी कुलसचिव आणि कुलगुरू यांना पत्र लिहून हा सर्व घटनाक्रम सांगितला आहे. त्यांच्या आघाडीवर देखील 'ठंडा ठंडा.. कूल कूल' आहे.

बायोमेट्रिक उपकरणे कशासाठी ?

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या 'लेडीज होस्टेल' च्या गेटवर बायोमेट्रिक उपकरणे बसवलेली आहेत. असे असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात दारू आणि इतर नशेच्या गोष्टी आत कशा जातात? अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्यावतीने लेखी पत्रव्यवहार करून या सर्व प्रकारावर चौकशी समिती स्थापन करण्याची कुलगुरूंना विनंती करण्यात आली आहे. या सर्व प्रकरणात जे कोणी दोषी असतील, त्या सर्वांवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून करण्यात आली आहे.

### प्रकरण दडपायचे आहे की काय?

या गंभीर प्रकारामुळे पुण्यात नेमके चालले आहे काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनावर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वसतिगृह महिला अधिकाऱ्याने या प्रकाराकडे कानाडोळा का केला ? प्रकरण दडपायचे आहे की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये देखील काळजीचे वातावरण आहे.

### आरोग्य विभागाचा फिरत्या व्हॅनचा उपक्रम

# नागरिकांची मोफत कर्करोग तपासणी!

## आतापर्यंत 7 हजार 385 जणांची तपासणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशभरात कर्करोगाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना कर्करोग आणि त्याच्या लक्षणांविषयी फारशी माहिती नसते. त्यामुळे आरोग्य विभागाने फिरत्या व्हॅनच्या माध्यमातून कर्करोग तपासणी सुरू केली आहे. या व्हॅनच्या माध्यमातून आतापर्यंत ७ हजार ३८५ जणांची तपासणी झाली असून, त्यातील ३७ जणांना कर्करोगाचे निदान झाले आहे.**



आरोग्य विभागाने पुणे विभागात ९ फेब्रुवारीला बारामतीतील महिला रुग्णालयापासून फिरत्या व्हॅनच्या माध्यमातून कर्करोग तपासणी मोहीम सुरू झाली. यात प्रामुख्याने मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची तपासणी केली जात आहे. या व्हॅनमध्ये रुग्णांची तपासणी करण्यासाठी स्त्रीरोग तज्ज्ञ, दंत शल्य चिकित्सक आणि इतर प्रशिक्षित अधिकारी आणि कर्मचारी आहेत. तपासणी झालेल्या रुग्णांमध्ये कर्करोगाची लक्षणे आढळून आल्यास त्यांना पुढील तपासणीसाठी नजीकच्या सरकारी रुग्णालयात पाठविण्यात येते. रुग्णालयात या रुग्णांचे कर्करोगाचे निश्चित निदान केले जाते.राज्यात मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयमुखाचा कर्करोगाचे रुग्ण जास्त आढळून येत आहेत. यामुळे या तिन्ही कर्करोगांची तपासणी करण्यात येत आहे. आतापर्यंत पुणे जिल्ह्यात एकूण ७ हजार ३८५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यात मुखाच्या कर्करोगासाठी ३ हजार २१८३ जणांची तपासणी करण्यात आली.

त्यातील ९ जणांना पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले आणि त्यात एकाला कर्करोगाचे निदान झाले. स्तनाच्या कर्करोगासाठी २ हजार ३०५ महिलांची तपासणी करण्यात आली. त्यातील ७३ जणींना पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले आणि त्यात १५ जणींना कर्करोगाचे निदान झाले. गर्भाशयमुखाच्या कर्करोगासाठी १ हजार ८९७ महिलांची तपासणी करण्यात आली. त्यातील ७२ जणींना पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले आणि त्यात २१ जणांना कर्करोगाचे निदान झाले.

### 1 हजार 897 महिलांची तपासणी

स्तनाच्या कर्करोगासाठी २ हजार ३०५ महिलांची तपासणी करण्यात आली. त्यातील ७३ जणींना पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले आणि त्यात १५ जणींना कर्करोगाचे निदान झाले. गर्भाशयमुखाच्या कर्करोगासाठी १ हजार ८९७ महिलांची तपासणी करण्यात आली.

ग्रामीण भागात कर्करोगाविषयी फारशी जागरूकता नाही. त्यामुळे आरोग्य विभागाने फिरत्या व्हॅनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांची कर्करोग तपासणी सुरू केली आहे. यातच धर्तीवर शहरातील झोपडपट्टी भागात लवकरच तपासणी सुरू केली जाणार आहे. आरोग्य विभागाने पुणे विभागात ९ फेब्रुवारीला बारामतीतील महिला रुग्णालयापासून फिरत्या व्हॅनच्या माध्यमातून कर्करोग तपासणी मोहीम सुरू झाली.

यात प्रामुख्याने मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची तपासणी केली जात आहे. या व्हॅनमध्ये रुग्णांची तपासणी करण्यासाठी स्त्रीरोग तज्ज्ञ, दंत शल्य चिकित्सक आणि इतर प्रशिक्षित अधिकारी आणि कर्मचारी आहेत. तपासणी झालेल्या रुग्णांमध्ये कर्करोगाची लक्षणे आढळून आल्यास त्यांना पुढील तपासणीसाठी नजीकच्या सरकारी रुग्णालयात पाठविण्यात येते. रुग्णालयात या रुग्णांचे कर्करोगाचे निश्चित निदान केले जाते.आतापर्यंत पुणे जिल्ह्यात एकूण ७ हजार ३८५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यात मुखाच्या कर्करोगासाठी ३ हजार २१८३ जणांची तपासणी करण्यात आली. त्यातील ९ जणांना पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले आणि त्यात एकाला कर्करोगाचे निदान झाले.

---

### कलावंतांच्या प्रश्नासाठी सांस्कृतिक मंत्र्यांना भेटणार!

## लंके यांनी तमाशा पंढरीस भेट देऊन जाणून घेतल्या कलाकरांच्या समस्या

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्राची लोककला असलेल्या लोकनाट्य तमाशा फडातील कलावंतांच्या काही मागण्या असून त्यासंदर्भात खा. शरद पवार यांच्या माध्यमातून आपणासह शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे केंद्रीय सांस्कृतीक मंत्र्यांची भेट घेऊन या मागण्यांची तड लावणार असल्याचे खा. नीलेश लंके यांनी नारायणगाव येथे सांगितले.**



नीलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून गड, किल्ले संवर्धन मोहिमेचा शुभारंभ करून परतताना खा. लंके यांनी नारायणगांव येथील तमाशा पंढरीस भेट देऊन तेथील कलाकरांच्या समस्या जाणून घेतल्या.यावेळी बोलताना खा लंके म्हणाले, केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्यांकडे कलावंतांच्या काही मागण्या आहेत. तमाशा कलावंतांना पॅकेज मिळाले पाहिजे ही एक प्रमुख मागणी आहे. सध्या दिल्लीत अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या विभागाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे व शरद पवार यांच्या माध्यमातून आपण केंद्रीय सांस्कृतीक मंत्र्यांसमवेत लवकरच बैठक घेणार आहेत. त्यासाठी तमाशा कलावंतांच्या शिष्टमंडळालाही बोलविण्यात येणार असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.तमाशा ही लोककला लोप पावत चालली आहे. ही पारंपारिक लोककला जिवंत राहिली पाहीजे असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याचे मत आहे. तमाशा कलावंत आणि माझं आपुलकीचं नाते आहे . ज्यावेळी कोव्हीडची महामारी आली, त्यावेळी याच तमाशा कलावंतांनी आमच्या भाळवणी येथील शरदचंद्र पवार आरोग्य मंदिरात मनोरंजनाचे कार्यक्रम घेऊन अनेक रूग्णांना कोरोनातून बाहेर काढले. तमाशा कलावंतांच्या व्यथा, अडीअडचणी मला माहीती आहे. तमाशा कलावंतांच्या वाहनांकडून टोल आकारला जाऊ नये ही छोटीशी मागणी आहे.

### कलाकाराला सन्मान मिळाला पाहिजे

ज्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या वाहनांसाठी आपण आग्रही असतो तशीच भूमिका तमाशा कलावंतांसाठीही असल्याचे खा. लंके यांनी स्पष्ट केले.कलावंतांचे मानधही मिळत नाही. कलाकाराचे ठराविक वय असते. त्या वयापलीकडे गेल्यानंतर या कलाकारांवर उपासमारीची वेळ येते. ठराविक वयात कलाकाराला जो मान-सन्मान मिळतो तो त्याला आयुष्यभर मिळाला पाहिजे.

## महापालिका व मराठी चित्रपट असोसिएशनतर्फे आयोजन

# पिंपरी चिंचवडमध्ये मराठी चित्रपट महोत्सव !

### प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात 24 व 25 मार्च रोजी आयोजन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**‘मराठी चित्रपट संवर्धन आणि प्रदर्शनास चालना’ या बहूउद्देशीय संकल्पनेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि मराठी चित्रपट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नाट्यगृहात चित्रपट संकल्पने अंतर्गत मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले आहे. २४ मार्च ते २५ मार्च २०२५ याकाळात पिंपरी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे पोस्टर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते आज बुधवारी (१९ मार्च) प्रकाशित करण्यात आले.**



याप्रसंगी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उप आयुक्त पंकज पाटील,उप आयुक्त आण्णा बोदडे,विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्य लिपिक देवेंद्र मोरे, मराठी चित्रपट असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश सरचिटणीस कौस्तुभ कुलकर्णी उपस्थित होते.

मराठी चित्रपट महोत्सवामध्ये ‘मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी’, ‘इलू इलू’, ‘मुक्काम पोस्ट देवाचं घर’, ‘चिकी चिकी बुबूमबूम’, ‘श्यामची आई’, ‘संगीत मानापमान’ असे विविध चित्रपट दाखवण्यात येणार आहे. या चित्रपटांची निवड विद्यार्थी, तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच स्तरातील प्रेक्षकांचा विचार करून करण्यात आली आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या चित्रपट महोत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मराठी भाषेचा प्रचार प्रसारासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. मराठी चित्रपट महोत्सव या उपक्रमांचा एक भाग आहे. मराठी भाषेचे सांस्कृतिक वैभव जनसमान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी, मराठी भाषेबद्दल आपुलकी आणि प्रेम निर्माण करण्यासाठी हा महोत्सव उपयुक्त ठरेल.
> **–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक

> मराठी भाषेला समृद्ध करणाऱ्या उपक्रमांना नेहमीच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रोत्साहन देत असते. महानगरपालिकेने आता मराठी चित्रपट असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवात दाखवण्यात येणारे चित्रपट प्रत्येक वयोगटातील प्रेक्षक विचारात घेऊन निवडण्यात आले असून या महोत्सवाला शहरातील नागरिकांनीही उत्तम प्रतिसाद द्यावा.
> **–प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त

#### तिकिटाची किंमत नाममात्र

मराठी चित्रपट महोत्सवामध्ये दाखवण्यात येणारे चित्रपट हे नुकतेच प्रदर्शित झाले आहेत. महोत्सवामध्ये या चित्रपटासाठी नाममात्र ५० रुपये तिकीट ठेवण्यात आले आहे. हे तिकीट ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने खरेदी करता येणार आहे. ऑनलाइन तिकीट खरेदी ticketkhidakee.com या संकेतस्थळावर करता येईल. तसेच प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथेही २१ मार्च २०२५ पासून तिकीट विक्री सुरू करण्यात येणार आहे.

याशिवाय प्रेक्षकांना ७८९७८९७२४७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करून तिकीट बुक करता येईल.

---

# पिंपरीतील १०० होर्डिंगधारकांना नोटिसा!

### परवाना नूतनीकरण करणे बंधनकारक असताना नूतनीकरणास टाळाटाळ

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील होर्डिंगधारकांना दरवर्षी परवाना नूतनीकरण करणे बंधनकारक असताना नूतनीकरणास टाळाटाळ केली जात असल्याचे समोर आले आहे. परवाना नूतनीकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या १०० होर्डिंगधारकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. ३१ मार्चपूर्वी नूतनीकरण न केल्यास संबंधित होर्डिंग अनधिकृत समजून कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.**



महापालिकेची परवानगी न घेतला लावलेल्या होर्डिंगवर ~~कारवाई करून होर्डिंगधारकांवर~~ महापालिका प्रशासनाने गुन्हे दाखल केले आहेत. शहरातील किवळे येथे १७ एप्रिल २०२३ रोजी अनधिकृत होर्डिंग कोसळून पाच मजुरांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर महापालिकेने शहरातील १७४ अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त केले.

शहरात सद्य:स्थितीत सुमारे एक हजार ४०० होर्डिंग अधिकृत असल्याचा दावा आकाशचिन्ह व परवाना विभागाने केला आहे. किवळे दुर्घटनेनंतर प्रशासनाने होर्डिंगच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली असली तरी होर्डिंगधारकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

#### थकबाकी असणाऱ्या होर्डिंगधारकांनाही नोटिसा


आकाशचिन्ह व परवाना विभागाला चालू आर्थिक वर्षात १८ कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत १६ कोटी ६७ लाख रुपयांचे उत्पन्न महापालिकेच्या तिजोरीत जमा झाले आहे. १५ होर्डिंगधारकांकडे दीड लाख ते पाच लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यांनाही नोटिसा देण्यात आल्या आहेत.

परवाना नूतनीकरण न केलेल्या शंभर होर्डिंगधारकांना नोटिसा दिल्या होत्या. त्यापैकी ४० होर्डिंगधारकांनी परवाना नूतनीकरणासाठी अर्ज केले आहेत. ३१ मार्चपूर्वी परवान्याचे नूतनीकरण न केल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा उपायुक्त प्रदीप ठेंगल यांनी दिला आहे.

शहरात अधिकृत असलेल्या एक हजार ४०० होर्डिंगधारकांपैकी शंभर होर्डिंगधारकांनी चालू आर्थिक वर्षासाठीच्या परवान्याचे नूतनीकरण केलेले नाही. त्यामुळे या होर्डिंगधारकांना आकाशचिन्ह व परवाना विभागाने नोटिस दिल्या आहेत.

नोटीस मिळताच शंभरपैकी ४० होर्डिंगधारकांनी परवाना नूतनीकरणासाठी अर्ज केले आहेत. मात्र, अद्याप ६० जणांनी अर्ज केलेले नाहीत. होर्डिंगधारकांनी ३१ मार्चपूर्वी परवान्याचे नूतनीकरण करून घ्यावे, अन्यथा होर्डिंग अनधिकृत समजून कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचात भगवंताचे अनुसंधान ठेवा.

तुम्ही इथे इतकेजण जमला आहात, त्यांपैकी कुणीही मला सांगावे की, आपली सर्व धडपड कशाकरिता असते? प्रत्येकजण सुखासाठी खटपट करीत असतो. प्रपंचात सुख मिळावे असे सर्वांना वाटत असते आणि त्याकरिता जो तो प्रयत्न करीत असतो. परंतु आजपर्यंत प्रपंचात कुणाला सुख मिळाले आहे ? ज्याला मिळाले असेल त्याने तसे सांगावे. कुणी म्हणतो, मजजवळ संपत्ती आहे पण संतान नाही; कुणी दारिद्र्य आहे म्हणून रडतो; कुणी काही, कुणी काही, सांगतच असतो, आणि म्हणतो की, माझी इच्छा पूर्ण झाल्यावर मी सुखी होईन. पण ती इच्छा तृप्त झाल्यावर दुसरी तयारच असते. म्हणजेच, आपली हाव कधीच तृप्त होणे शक्य नाही. मृगजळ पिऊन कुणी कधी तृप्त झाला आहे का ? प्रपंच जिथे खोटा तिथे सुख कसले मागता ? याचा अर्थ असा नाही की प्रपंच सोडावा; पण तो सुखाचा कसा होईल हे पाहात जावे. मी तुम्हांला खात्रीने सांगतो की, प्रपंच जर सुखाचा करायचा असेल तर त्याला एकच उपाय आहे. तो अगदी सोपा आहे, तो म्हणजे, 'प्रपंच माझा नाही, तो रामाचा आहे' असे म्हणा म्हणजे झाले. हे दिसण्यात सोपे आहे. पण आचरणात आणायला अत्यंत कठीण आहे; ते परमात्म्याची कृपा झाल्याशिवाय साधायचे नाही. याकरिता रामाला अनन्यभावाने शरण जावे म्हणजे त्याची कृपा होईल. त्याच्या कृपेला तुम्ही देहबुद्धीचा बंधारा घालू नका. सर्व विसरून भगवंताला आळवावे. भगवंताची कृपा आपल्यावर आहेच असे म्हणावे. ती काम करीतच असते, आपण आपल्या शंकेने ती झाकून टाकू नये. आपण भगवंताला म्हणावे, "भगवंता, मी सर्वस्वी तुझा आहे. माझा प्रपंच हा तुझाच आहे. तुझी भक्ती कशी करावी हे मला माहीत नाही. तू मला मार्ग दाखव. तू जे करशील त्यात मी सामील होईन." अशी अगदी मनापासून प्रार्थना करावी. मग तो ठेवील त्या परिस्थितीमध्ये आपण अगदी आनंदात राहावे.

तुम्ही इतके कष्ट घेऊन मला भेटायला येता, पण रिकामे परत जाता हे पाहून मला वाईट वाटते. माझ्याजवळ जे आहे ते तुम्हांला व्यावहारिक जगात कुठेही मिळायचे नाही. ते म्हणजे भगवंताच्या नामाचे प्रेम होय. जे संतांनी सांगितले आहे तेच मी सांगतो; ते सत्य आहे असे मनापासून समजा, खरोखर राम तुम्हांला सुखी करील. तुम्हांला माझा आशीर्वाद आहे की तुम्हांला नामाचे म्हणजे भगवंताचे प्रेम खात्रीने लाभेल.

**बोधवचन:- सुखाने प्रपंच करा, पण त्यामध्ये भगवंताचे अनुसंधान ठेवा.**




## 'स्टेट'मेंट


अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक


# कोणतीही दंगल असू दे, हिंदूंची पोरं, सपाटून मार खाणार, हे ठरलेलं !

**देशात कोठेही दंगल होवो, मग ते नागपूर असो नाहीतर संबल.. लखनऊ असो नाहीतर भोपाळ.. दंगलीत नेहमीच मुस्लिम आक्रमक असतात आणि हिंदूंची पोरं सपाटून, बेदम मार खात असतात हे कायमचे चित्र आहे.**



### 'एफआयआर' मधील नावे पाहा..

नागपूरमध्ये दोन दिवसांपूर्वी जी दंगल भडकली, त्याचे सीसीटीव्ही फुटेज पाहा..दगडफेक करणारे मुस्लिम, गाड्या फोडणारे मुस्लिम, जाळपोळ करणारे मुस्लिम.. आणि मार खाणारे हिंदू..हो, यावेळी, दुर्दैवाने पोलीस देखील मार खात होते ! ज्या ५१ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, त्यांची नावे पाहा.. झाडून सगळे मुस्लिम आहेत ! या दंगलीचा 'मास्टरमाईंड' नागपूरमधील 'मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टी'चा अध्यक्ष फईम खान हा आहे आणि त्याने नितीन गडकरी यांच्या विरोधात लोकसभा निवडणूक देखील लढवली आहे.

### ५००-६०० चा जमाव गोळा केला !

पूर्वी महाराष्ट्रात मिरज, भिवंडी, संगमनेर किंवा मालेगाव ही शहरे दंगलीसाठी प्रसिद्ध होती. पाकिस्तान हरला, बाबरी मशिदीसारखी घटना घडली की त्याचे हमखास पडसाद या शहरांमध्ये उमटायचे. नागपूर मात्र शांत असायचे. पण, या तथाकथित म्होरक्याने मुस्लिमांचा मोठा जमाव जमवला आणि पोलीस चौकीवर चालून गेला.

### जमावाला भडकावले.. हिंसक केले..

त्यानंतर हिंदूंच्या विरोधात, औरंग्या आणि मुस्लिमांच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या गेल्या आणि समोरच्या हिंदू बहुल भागात ही मंडळी घुसली. पुढे काय काय झाले, ते आपण सर्वजण जाणतोच! प्रश्न एकच आहे, ज्यावेळी अशा दंगली भडकतील, त्यावेळी मुस्लिम हे नेहमीच हिंदूंच्या मुलांना मरेपर्यंत मारणार का? पोलिसांना टार्गेट करणार का? महिला पोलीस अधिकाऱ्यांचा विनयभंग करणार का? त्यांचे कपडे फाडणार का?

### गुंडगिरीचा सिनेमा पाहतो, की काय?

तमाम हिंदूंचे बलस्थान आणि विरोधकांची सत्ता उलथवून टाकणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उगमस्थान आहे, त्याच महाल परिसरातल्या मूठभर मुस्लिमांनी हिंदूंना ठेचून काढले आणि पोलिसांच्या अंगावर हात टाकून शस्त्रांनी वार करून त्यांनाही जखमी केले, झोडपून काढले..चक्क महिला पोलीस स्वतःची अब्रू वाचविण्यासाठी एका धाडसी हिंदूच्या घरात रात्रभर लपून बसल्या. एखादा मवाली गुंड, त्या गल्लीचा भाई किंवा दादा जसा एखाद्याच्या घरात घुसून मोहल्ल्यात जाऊन पोटात चाकू खुपसून सहीसलामत बाहेर पडतो, त्याप्रमाणे ! जे आपण अनेकदा सिनेमांमधून बघतो, तेच नागपूरच्या दंगलीत पाहायला मिळाले.. स्थानिक हिंदूंनी प्रत्यक्ष अनुभवले!

### गुंडांची नजर पोलीस आणि महिलांवर..

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे कट्टर पाठीराखे,bसंघ स्वयंसेवक ज्या भागात आहेत, त्यांच्याच हिंदू बंधू भगिनी आणि पोलिसांवर जर फईम खानच्या जिहाद्यांची वाकडी नजर पडून समस्त हिंदूंना मार खावा लागत असेल..जखमी अवस्थेत पळ काढावा लागत असेल, तर संघाचे तरुण काठ्या फक्त संचलनासाठी वापरतात की काय अशी शंका येऊ लागली आहे.

### शस्त्रे वापरण्यासाठी, फक्त पूजेसाठी नाही!

दसऱ्यादिवशी संघ स्थानावर शस्त्रांची पूजा केली जाते, ती शस्त्रे केवळ घरात शोभिवंत वस्तू म्हणून बाळगायची नाहीत, तर मूठभर मुस्लिम जर यापुढे हिंदूंवर चाल करून आले, तर स्वयंसेवकांनी लगेच घरातली शस्त्रे बाहेर कढून संघ स्थानावर शस्त्रांचे शिकविण्यात आलेले धडे पुढच्या क्षणी गिरवायला सुरुवात करायची आहे, असे आदेश सरसंघचालकांनी द्यायला हवेत.

### मूठभर मुस्लिमांचा हैदोस..

मूठभर मुस्लिमांनी नागपूरमध्ये फडणवीस, मोहन भागवत, नितीन गडकरींसहित राज्यातल्या समस्त हिंदूंना दाखवून दिले, की प्रसंगी आम्ही तुम्हाला तुमच्याच मोहल्ल्यात येऊन ठेचून काढू शकतो, आणि हे जर महाराष्ट्रात आज घडले, ज्यात मुस्लिम यशस्वी ठरले, उद्या ते हेच हल्ले पुन्हा कुठेही घडवून आणतील आणि हिंदू पळत सुटतील.. आपल्याच पोलिसांना मार बसतोय, हे बघून !

### योगींचे उदाहरण डोळ्यासमोर..

उत्तर प्रदेशचे उदाहरण पाहा. भारतातील सर्वात जास्त दंगली होणारा प्रदेश..मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी कसा सुतासारखा सरळ केला आहे.. कुख्यात गुंडांना रस्त्यात गोळ्या घालण्यापर्यंत पोलिसांना ताकद मिळाली आहे. रडत येऊ नका, विषय तिथंच संपवा, असा भक्कम पाठिंबा योगींनी पोलीस खात्याला दिला आहे.

### फडणवीस-शिंदे-दादांकडून तीच अपेक्षा..

नेमकी हीच अपेक्षा राज्यातील फडणवीस, शिंदे, अजितदादांबाबत आहे. यापुढे हिंदूंनी मार खायचा नाही..तुम्ही मुस्लिमांच्या जमावावर तुटून पडतांना तुमच्या नक्की पाठीशी हे तिघे आहेत..काळजी करायची नाही, संकटाकडे पाठ फिरवून यायचे नाही, हार मानायची नाही आणि जात्यंध पाक विचारांच्या देशद्रोह्यांचा यापुढे मार खायचा नाही. आक्रमक फडणवीस म्हणाले, की दंगल घडवून आणणाऱ्यांना कबरीतून शोधून काढू, त्यांच्याकडून कृतीची गरज आहे, जनतेला तेवढा विश्वास अजून मिळालेला नाही.

### हिंदूंच्या बालेकिल्ल्यात घुसून की राव?

देशद्रोह्यांना आणि जात्यंधांना नेमके हेच सुचवायचे होते, की जर आम्ही तुम्हाला तुमच्या बालेकिल्ल्यात येऊन 'सळो की पळो' करून सोडू शकतो..देशात इतरत्र हल्ले केले, तर तुमची अवस्था काय असेल? सगळ्यात महत्वाचे म्हणजे नागपुरातील महाल परिसरातले मुस्लिम पोलीस सावध झाल्याने केवळ काही काळ शांत झालेले आहेत, ते अजिबात घाबरलेले नाहीत ! पण, यापुढे जर त्यांना पुन्हा तोंड वर काढू द्यायचे नसेल, तर उत्तर प्रदेश पद्धतीने त्यांना जागोजागी ठेचून काढणे आता महत्त्वाचे आहे.

### जागोजागी मुस्लिमांचा त्रास आणि जाच

महाराष्ट्रात हिंदूंची सत्ता येऊनही जर जागोजाग तुम्हाला त्यांचा त्रास आणि जाच सहन करावा लागत असेल, तर घरात ठेवलेली शस्त्रे आणि लाठ्याकाठ्या फक्त शोभेच्या वस्तू नाहीत, हे लक्षात घ्या. संघाचा स्वयंसेवक आपल्या बालेकिल्ल्यात मार खातो, हे कधीही घडता कामा नये. आम्हाला हिंदूंच्या भावना भडकवायच्या नाहीत. हिंदू हा संयमी, विचार करणारा, संवेदनशील असतो, तो आक्रमक होणार नाही, हे माहीत आहे. पण, गप्प बसलेल्या सिंहाला जर उठसूठ कोणीही दगड मारत असेल, तर अधून मधून त्याला गर्जना ही दिलीच पाहिजे.. त्याशिवाय त्याचे अस्तित्व दिसणार नाही, हेच खरे !


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नागपूर हिंसाचार पूर्वनियोजित होता!

## 51 जणांना अटक; 24 आरोपी नागपूरचे रहिवासीच नाहीत





। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा तापल्यानंतर उपराजधानी नागपुरात उसळलेल्या हिंसाचारानंतर पोलिसांनी ५१ जणांना अटक केली आहे. सोमवारी रात्रीच्या सुमारास नागपुरात दोन गट भिडले. त्यांनी एकमेकांवर तुफान दगडफेक केली. यावेळी अनेक घरं, दुकानं, वाहनं लक्ष्य करण्यात आली. सोमवारी झालेला हिंसाचार पूर्वनियोजित होता, अशी शंका उपस्थित केली जात आहे. या संशयाला बळ देणारी माहिती पोलीस तपासातून पुढ आली आहे.**

हिंसाचार प्रकरणात पोलिसांच्या एफआयआरमध्ये ५१ जणांची नावं आहेत. त्यांचे पत्तेही पोलिसांच्या हाती लागले आहेत. विशेष म्हणजे यातील जवळपास निम्मे आरोपी मध्य नागपूरचे रहिवासीच नाहीत. सोमवारी रात्रीच्या सुमारास मध्य नागपुरात हिंसाचार उफाळला. या प्रकरणात पोलिसांच्या एफआयआरमध्ये ५१ जणांची नावं आहेत. त्यातील २४ आरोपी बाहेरचे आहेत. त्यामुळे हे २४ जण हिंसाचारावेळी मध्य नागपुरात का आले होते, ते हिंसाचार घडवण्यासाठी आले होते का, याचा तपास पोलिसांनी सुरु केला आहे. चिटणीस पार्क परिसरात हिंसाचार उफाळला. त्याची झळ आसपासच्या भागालाही बसली. चिटणीस पार्कसह आसपासच्या परिसरात दगडफेक, जाळपोळ झाली. या प्रकरणातील एफआयआरमध्ये ५१ जणांची नावं आहेत. त्यातील २४ जण बाहेरच्या भागातून मध्य नागपुरात आले होते. कळमना, पारडी, उमरेड रोड, यशोधरा नगर, वाठोडा, टेक नाका, जाफर नगर, तासबाग परिसरातून ते हिंसाचार घडला त्या भागांमध्ये आले होते. पोलिसांच्या एफआयआरमध्ये नावं असलेले २४ जण हिंसाचारग्रस्त भागापासून कित्येक किलोमीटर दूरवर राहतात. हे सगळे हिंसाचार घडवण्यासाठीच सोमवारी मध्य नागपुरात आले होते, त्याचा तपास पोलिसांनी सुरु केला आहे. कळनमा, पारडी, उमरेड रोड, यशोधरा नगर, वाठोडा, टेक नाका, जाफर नगर, तासबाग हे सगळे भाग जिथे हिंसाचार उफाळला, त्या भागाच्या चारही बाजूंना आहेत. त्यामुळे मध्य नागपुरात हिंसा घडवण्यासाठी आसपासच्या भागातून माणसं बोलावण्यात होती का, हा प्रश्न कायम आहे. सोमवारी दुपारच्या सुमारास विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाचं आंदोलन झालं. कबर हटवण्याची मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली. त्यानंतर हिंसाचार प्रकरणाचा मास्टरमाईंड फहीम खानच्या नेतृत्वात काही तरुण शिवाजी पुतळा चौकात एकवटले.

त्यांनी घोषणाबाजी सुरु केली. विश्व हिंदू परिषदेच्या विरोधात त्यांनी आंदोलन सुरु केलं. पोलिसांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण ते तिथून हटायला तयार नव्हते. त्यामुळे पोलिसांनी बळाचा वापर करावा लागला. विश्व हिंदू परिषदेच्या आंदोलनात आयत लिहिलेली चादर जाळण्यात आल्याचा दावा करत फहीम खान शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर आंदोलनाला बसला. त्याच्यासोबत त्याचे समर्थक होते. त्या दिवशी शिवरायांची जयंती होती. त्यामुळे शिवभक्त, शिवप्रेमी शिवरायांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होण्यासाठी येत होते. ही बाब लक्षात आल्यानं पोलिसांनी फहीम खानला चौकात एका बाजूला आंदोलन करण्यास सांगितलं. पण फहीम आणि त्याचे समर्थक ऐकायला तयार नव्हते. फहीम खाननं समर्थकांसह जोरदार घोषणाबाजी सुरु केली.

### पोलिसांविरोधात घोषणाबाजी

पोलिसांची विनंती त्यानं धुडकावली. विश्व हिंदू परिषदेच्या कृतीबद्दल आक्षेप असल्यास तुम्हाला आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. फक्त ते चौकात एका कोपऱ्यात जाऊन करा. जेणेकरुन शिवप्रेमींना अडचण होणार नाही, अशा शब्दांत पोलीस आयुक्तांनी फहीम खानला समजावलं. पण तो ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्यानं पोलिसांविरोधात घोषणाबाजी केली. भडकाऊ भाषणं करण्यास सुरुवात केली. फहीम आणि त्याचे समर्थक हटत नसल्यानं पोलिसांनी बळाचा वापर केला. जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत इथून हटायचं नाही, असं खान त्याच्या समर्थकांना सांगत होता.

# मोफत घरे उपलब्ध करणे अयोग्य : न्यायालय

## मुंबईत झोपडपट्ट्या एक गंभीर समस्या बनली आहे



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**झोपडपट्टी पुनर्वसन (झोपु) योजनेंतर्गत झोपडीधारकांना मोफत घरे देण्याच्या सरकारच्या धोरणाबाबत उच्च न्यायालयाने पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित केला. तसेच, झोपडीधारकांचे पुनर्वसन करताना त्यांना मोफत घरे उपलब्ध करण्याऐवजी त्यांच्याकडून विशिष्ट रक्कम आकारण्याची गरज न्यायालयाने बोलून दाखवली.**

त्याचप्रमाणे, मुंबईतील २०११ पर्यंतच्या झोपड्यांना संरक्षण देण्यात आले असून त्यानंतर सरकारने ही मुदत वाढवलेली नसल्याबाबत न्यायालयाने समाधान व्यक्त केले. तसेच, सरकार ही भूमिका पुढेही कायम ठेवेल, अशी आशा न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने व्यक्त केली. तथापि, हे धोरण केवळ मुंबईपुरते मर्यादित आहे की राज्यातील अन्य शहरांनाही लागू आहे, अशी विचारणा न्यायालयाने सरकारकडे केली व त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. सर्वोच्च न्यायालयाने ३० जुलै रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, मंजुरी आणि पुनर्विकास) कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटींबाबत चिंता व्यक्त केली होती. तसेच, कायद्याच्या पुनरावलोकनाचे आदेश उच्च न्यायालयाला दिले होते. त्यानुसार, उच्च न्यायालयाने स्वतःहून या प्रकरणी जनहित याचिका दाखल केली असून न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठापुढे त्यावर सध्या विशेष सुनावणी सुरू आहे. या प्रकरणी झालेल्या सुनावणीच्या वेळी मुंबईतील झोपडपट्ट्यांची संख्या, झोपु योजनेंतर्गत त्यांना दिली जाणारी मोफत घरे, पायाभूत सुविधांवर येणारा ताण याबाबतही न्यायालयाने प्रश्न उपस्थित करून मुंबईत झोपड्याच राहणार नाहीत अशी योजना अंमलात आणण्याबाबत विचार होणे गरजेचे असल्यावर न्यायालयाने यावेळी भर दिला. मुंबईत झोपडपट्ट्या ही एक गंभीर समस्या बनली आहे. परराज्यातून मुंबईत येणाऱे बहुतांश नागरिक झोपड्यांमध्ये राहतात. पुढे, सरकारी धोरणाचा फायदा म्हणून त्यांना मोफत घरे दिली जातात. परंतु, यामुळे सरकारी तिजोरीवर ताण येतो. त्यामुळे, यापुढे झोपडीधारकांचे पुनर्वसन करताना त्यांना पूर्णपणे मोफत घरे उपलब्ध मिळणार नाही, याचा विचार व्हायला हवा.असेही न्यायालयाने म्हटले, त्याचवेळी, मुंबईतून झोपड्या किंवा झोपडपट्ट्या हद्दपार करण्यासाठी विशिष्ट योजना राबवण्याची आवश्यकता असल्याचेही न्यायालयाने म्हटले.

### परराज्यातून येणाऱे बहुतांश नागरिक

ही समस्या दूर करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असेही न्यायालयाने स्पष्ट केले तथापि, हे धोरण केवळ मुंबईपुरते मर्यादित आहे की राज्यातील अन्य शहरांनाही लागू आहे, अशी विचारणा न्यायालयाने सरकारकडे केली व त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

# विल्यम्स यांचे पृथ्वीवर सुरक्षित 'लँडींग'!

## पहाटे 3.30 च्या सुमारास स्पेस कॅप्सूल समुद्रात उतरले

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अंतराळवीर सुनीता विल्यम्स या नऊ महिने अंतराळात घालवल्यानंतर सुरक्षितपणे पृथ्वीवर परतल्या आहेत. भारतीय वेळेनुसार पहाटे ३.३० च्या सुमारास त्यांचे स्पेस कॅप्सूल फ्लोरिडाच्या समुद्रात उतरले. सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर हे केवळ आठ दिवसांच्या अंतराळ मोहिमेवर आंतरराष्ट्रीय आंतराळ स्थानकात गेले होते.**




आंतराळ स्थानकात दोघेही आठ दिवस संशोधन करून परतणार होते. मात्र, त्यांच्या बोईंग स्टारलायनर या स्पेसक्राफ्टमधील तांत्रिक बिघाडामुळे त्यांना २८६ दिवस तिथेच घालवावे लागले. सुनीता विल्यम्स व विल्मोर यांना परत आणण्यासाठी अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने स्पेसएक्स या खासगी आंतराळ संशोधन कंपनीच्या मदतीने मोहीम आखली होती. स्पेसएक्सच्या अवकाशयानाने क्रू-९ ड्रॅगन या अवकाशयानाने १४ मार्च रोजी दोघांना परत आणण्यासाठी पृथ्वीवरून उड्डाण केलं आणि आज पहाटे ते यान दोन्ही अंतराळवीरांना घेऊन परतलं. नासाने विल्यम्स व विल्मोर यांना परत आणण्यासाठी स्पेसएक्सचं ड्रॅगन क्रू कॅप्सूलची निवड केली होती. स्पेसएक्स ड्रॅगन कॅप्स्यूल हे एक अत्याधुनिक अंतराळ यान आहे, जे उद्योगपती एलॉन मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीने विकसित केलं आहे. सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून पृथ्वीवर परत आणण्यासाठी या यानाचा वापर करण्यात आला. ड्रॅगन कॅप्स्यूल हे यान कार्गो ड्रॅगन आणि क्रू ड्रॅगन अशा दोन प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. सुनीता विल्यम्स यांच्या परतीच्या मोहिमेसाठी क्रू ड्रॅगन या यानाचा वापर करण्यात आला. जे खास अंतराळवीरांना घेऊन जाण्यासाठी डिझाइन करण्यात आलं आहे. हे कॅप्सूल बनवल्यापासून आतापर्यंत ४९ वेळा लाँच (उड्डाण) करण्यात आलं आहे. यापैकी ४४ वेळा या कॅप्सूलने अंतराळ सफर केली आहे. बऱ्याचदा आंतरराष्ट्रीय आंतराळ स्थानकाला भेट दिली आहे. या कॅप्सूलमध्ये सात अंतराळवीर बसून प्रवास करू शकतात.आंतराळ स्थानकात दोघेही आठ दिवस संशोधन करून परतणार होते. मात्र, त्यांच्या बोईंग स्टारलायनर या स्पेसक्राफ्टमधील तांत्रिक बिघाडामुळे त्यांना २८६

### पूर्णपणे ऑटोनॉमस अंतराळयान

या कॅप्सूलमध्ये सात अंतराळवीर बसून प्रवास करू शकतात.ड्रॅगन कॅप्सूल पूर्णपणे स्वायत्तपणे (ऑटोनॉमसली) काम करू शकतं. ते आयएसएसची आपोआप जोडलं जातं आणि पृथ्वीवर परत आणता येतं. आवश्यकता असल्यास या कॅप्सूलमध्ये बसलेले अंतराळवीर देखील हे चालवू, हाताळू शकतात.

दिवस तिथेच घालवावे लागले. सुनीता विल्यम्स व विल्मोर यांना परत आणण्यासाठी अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाने स्पेसएक्स या खासगी आंतराळ संशोधन कंपनीच्या मदतीने मोहीम आखली होती. स्पेसएक्सच्या अवकाशयानाने क्रू-९ ड्रॅगन या अवकाशयानाने १४ मार्च रोजी दोघांना परत आणण्यासाठी पृथ्वीवरून उड्डाण केलं आणि आज पहाटे ते यान दोन्ही अंतराळवीरांना घेऊन परतलं. नासाने विल्यम्स व विल्मोर यांना परत आणण्यासाठी स्पेसएक्सचं ड्रॅगन क्रू कॅप्सूलची निवड केली होती. स्पेसएक्स ड्रॅगन कॅप्स्यूल हे एक अत्याधुनिक अंतराळ यान आहे, जे उद्योगपती एलॉन मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीने विकसित केलं आहे. सुनीता विल्यम्स आणि त्यांचे सहकारी बुच विल्मोर यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून पृथ्वीवर परत आणण्यासाठी या यानाचा वापर करण्यात आला. ड्रॅगन कॅप्स्यूल हे यान कार्गो ड्रॅगन आणि क्रू ड्रॅगन अशा दोन प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. सुनीता विल्यम्स यांच्या परतीच्या मोहिमेसाठी क्रू ड्रॅगन या यानाचा वापर करण्यात आला. जे खास अंतराळवीरांना घेऊन जाण्यासाठी डिझाइन करण्यात आलं आहे. हे कॅप्सूल बनवल्यापासून आतापर्यंत ४९ वेळा लाँच (उड्डाण) करण्यात आलं आहे. यापैकी ४४ वेळा या कॅप्सूलने अंतराळ सफर केली आहे. बऱ्याचदा आंतरराष्ट्रीय आंतराळ स्थानकाला भेट दिली आहे.

# महाकुंभमधून १००० हिंदू भाविक बेपत्ता!

## अखिलेश यादव यांचे केंद्र आणि राज्य सरकारवर आरोप

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**समाजवादी पक्षाचे प्रमुख आणि उत्तर प्रदेशचे माजी खासदार अखिलेश यादव यांनी महाकुंभमेळ्याबाबत मोठे विधान केले आहे. प्रयागराजमधील महाकुंभमधून १००० हिंदू भाविक बेपत्ता झाल्याचा दावा अखिलेश यादव यांनी केला. तसेच केंद्र सरकारने महाकुंभसाठी किती निधी दिला होता? असाही सवाल त्यांनी उपस्थित केला.**



अखिलेश यादव यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर आरोप केले आहेत. ते म्हणाले,"मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री केवळ गाड्यांची पार्किंग सांभाळत होते. तर अनेक आयपीएस अधिकारी सामान्य लोकांना स्नान करण्यापासून रोखत होते. अनेक भाविकांना तर सीमेवरच अडविण्यात आले. महाकुंभमध्ये सामान्य लोकांना काय सुविधा दिल्या गेल्या, याबाबत सरकारने काहीही सांगितलेले नाही."इतिहासात पहिल्यांदा असे झाले आहे की, सर्वाधिक नुकसान हिंदू भाविकांचे होत आहे. अद्यापही १००० हिंदू भाविक बेपत्ता आहेत. मात्र सरकार त्यांची कोणतीही माहिती देत नाही. उलट बेपत्ता लोकांची पत्रके हटविण्यात येत आहेत", असा आरोप करत असताना अखिलेश यादव म्हणाले की, उत्तर प्रदेश सरकारने बेपत्ता लोकांना शोधून

### सर्वाधिक नुकसान हिंदू भाविकांचे

"इतिहासात पहिल्यांदा असे झाले आहे की, सर्वाधिक नुकसान हिंदू भाविकांचे होत आहे. अद्यापही १००० हिंदू भाविक बेपत्ता आहेत. मात्र सरकार त्यांची कोणतीही माहिती देत नाही. समाजवादी पक्षाचे प्रमुख आणि उत्तर प्रदेशचे माजी खासदार अखिलेश यादव यांनी महाकुंभमेळ्याबाबत मोठे विधान केले आहे.

त्यांच्या कुटुंबांना दिलासा दिला पाहिजे.दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी संसदेत महाकुंभमेळ्याबाबत आपली भूमिका मांडली. महाकुंभ देशाच्या एकतेचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले."महाकुंभ दरम्यान संपूर्ण देश एकजूट झालेला पाहायला मिळाला. लाखो भाविक सुविधा-असुविधा याची चिंता न करता प्रयागराजला आले. हीच आपली मोठी ताकद आहे."अखिलेश यादव यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर आरोप केले आहेत. ते म्हणाले, मुख्यमंत्री केवळ गाड्यांची पार्किंग सांभाळत होते. तर अनेक आयपीएस अधिकारी सामान्य लोकांना स्नान करण्यापासून रोखत होते. अनेक भाविकांना तर सीमेवरच अडविण्यात आले. महाकुंभमध्ये सामान्य लोकांना काय सुविधा दिल्या गेल्या, याबाबत सरकारने काहीही सांगितलेले नाही.

# जया बच्चन यांना ‘सिलसिला’मध्ये करायचे नव्हते काम

अमिताभ बच्चन(AMITABH BACHCHAN) व रेखा(REKHA) यांच्या लव्हस्टोरीबद्दल आजही बोलले जाते. जया बच्चन, अमिताभ बच्चन व रेखा यांच्याबद्दल अनेक चर्चा होत असत. आजही या सेलिब्रिटींच्या नात्याबद्दल चाहत्यांना उत्सुकता असलेली दिसते. आता लोकप्रिय लेखक हनीफ झावेरी यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत अमिताभ बच्चन व जया बच्चन यांची लव्हस्टोरी कधी सुरू झाली, तसेच रेखा व अमिताभ बच्चन यांच्या नात्याबद्दल जी चर्चा व्हायची याबद्दल खुलासा केला आहे. हनीफ झावेरी यांनी नुकतीच ‘मेरी सहेली’ या पॉडकास्टला दिली. या मुलाखतीत अमिताभ बच्चन यांच्या करिअरच्या सुरुवातीच्या काळाविषयी सांगत म्हटले,



“हृषिकेश मुखर्जी यांनी अमिताभ बच्चन यांना ‘गुड्डी’ या चित्रपटासाठी साईन केले होते. या चित्रपटात प्रमुख भूमिकेत जया भादुरी म्हणजेच जया बच्चन होत्य. मात्र, काही काळाने अमिताभ बच्चन यांना त्या चित्रपटातून काढून टाकण्यात आले, कारण त्यांचे आधीचे काही चित्रपट फ्लॉप झाले होते. ही जया भादुरी व अमिताभ बच्चन यांची पहिली भेट होती. त्यानंतर ‘एक नजर’ या चित्रपटात त्यांनी एकत्र काम केले, त्यावेळी जया भादुरी अमिताभ बच्चन यांच्या प्रेमात पडल्या. अमिताभ बच्चन यांची यशस्वी अभिनेता म्हणून कारकीर्द सुरू होण्यात जया भादुरी मोठा वाटा होता. कोणतीही आघाडीची अभिनेत्री अमिताभ बच्चन यांच्याबरोबर ‘जंजीर’ या चित्रपटात काम करण्यास तयार नव्हती. पण, जयाने आग्रह केला की अमिताभ बच्चनला चित्रपटात घ्या, मी त्याच्याबरोबर काम करेन. जयाचा हा निर्णय योग्य ठरला आणि ‘जंजीर’ चित्रपट मोठ्या प्रमाणात गाजला.”अमिताभ बच्चन-जया-रेखा या त्रिकुटाबद्दल चर्चा सुरू होण्याआधी जया व रेखा यांच्यामध्ये चांगली मैत्री होती. इतकेच नाही तर जया बच्चनने रेखाला ‘दुनिया का मेला’ या चित्रपटात काम करण्यासाठी मनधरणी केली होती.

# आर्यन खानला तुरुंगात सिगारेट दिली



बॉलीवूडचा किंग खान म्हणजे अभिनेता शाहरुख खान हा त्याच्या स्टाईल व चित्रपटांमुळे कायमच चर्चेत राहत असतो. मात्र एक काळ असा होता, जेव्हा शाहरुख खान आणि त्याचं कुटुंब वादाच्या भोवऱ्यात अडकलं होतं. २०२१ मध्ये शाहरुख खानचा मोठा मुलगा आर्यन खानला ड्रग्स केस प्रकरणात अटक करण्यात आली होती. याप्रकरणी आर्यन पूर्ण एक महिना तुरुंगात होता. आर्यन खान कायद्याच्या कचाट्यात अडकल्यामुळे खान कुटुंबावर तेव्हा दुःखाचा डोंगर कोसळला होता. आर्यनच्या या ड्रग्स प्रकरणाची चांगलीच चर्चा झाली होती. अशातच आता चार वर्षांनी एजाज खानने आर्यनच्या ड्रग्स प्रकरणावर भाष्य केलं आहे. एजाज खान आजवर अनेक टीव्ही शो आणि चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. ‘बिग बॉस सीझन ७’ मधून तो घराघरात प्रसिद्ध झाला. तो या शोचा दुसरा रनरअप होता. त्यालाही एका कथित ड्रग्ज प्रकरणात अटक करण्यात आली होती आणि तो मुंबईतील आर्थर रोड तुरुंगात होता.त्याचवेळी शाहरुखचा मुलगा आर्यन खान आणि शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्रा यांनाही वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये अटक करण्यात आली होती. तेव्हा त्यांनाही त्याच तुरुंगात ठेवण्यात आले होते. अशातच एजाजने नुकत्याच एका मुलाखतीत असा दावा केला आहे की, त्याने आर्यन आणि राज यांना तुरुंगात असताना मदत केली होती. हिंदी रशला दिलेल्या मुलाखतीत एजाजने याबद्दल भाष्य केलं.आर्यनबद्दल एजाजने असं म्हटलं की, “हा.... आर्यन खानही तिथे (आर्थर रोड जेल होता. तुरुंगात मी त्याला पाणी, सिगारेट दिलं होतं. तुरुंगात तुम्ही हेच देऊ शकता. आणखी काय देणार? यामुळे त्याला गुंड-माफियांपासून वाचवू शकता”. शिवाय राज कुंद्राबद्दल त्याने असं म्हटलं की, “राज कुंद्रा मला रोज मेसेज पाठवायचा. तो पाणी, ब्रेड, बिस्किटं मागायचा. त्याला पाणी देऊ नका असं अधीक्षकांनी सांगितलं होतं. त्याला बिस्लरीचं पाणी नाही, तर सामान्य पाणी प्यायला सांगितलं होतं.

# आमिर खान व गौरी स्प्रॅटचा व्हिडीओ व्हायरल

बॉलीवूडचे कलाकार हे त्यांच्या व्यावसायिक आयुष्याबरोबरच त्यांच्या खासगी आयुष्यामुळेदेखील मोठ्या चर्चेत असतात. अभिनेता आमिर खान(AAMIR KHAN) काही दिवसांपासून त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. १४ मार्चला अभिनेत्याने त्याचा ६० वा वाढदिवस साजरा केला. यादरम्यानच तो रिलेशनशिपमध्ये असल्याचे त्याने उघड केले. इतकेच नव्हे, तर त्याने माध्यमांशी बोलताना त्याच्या गर्लफ्रेंडचीदेखील ओळख करून दिली. गौरी स्प्रॅट, असे त्याच्या गर्लफ्रेंडचे नाव आहे. आता अभिनेत्याने याबद्दल खुलासा केल्यानंतर तो पहिल्यांदाच त्याच्या गर्लफ्रेंडबरोबर सार्वजनिक ठिकाणी दिसला आहे. त्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतानाही दिसत आहे. सोशल मीडियावर आमिर खान व गौरी स्प्रॅट यांचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. वारिंदर चावला या सोशल मीडिया अकाउंटवरून एक व्हिडीओ शेअर केला.

# तुमची पात्रता काय आहे?

भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात लावलेल्या आणीबाणीच्या घटनेवर आधारित ‘इमर्जन्सी’ हा चित्रपट १७ जानेवारीला प्रदर्शित झाला होता. बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौतने या चित्रपटाचे दिग्दर्शन केलं होतं. शिवाय चित्रपटात तिने इंदिरा गांधींची भूमिका साकारली आहे. मात्र, हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारसा यशस्वी झाला नाही. पॉलिटिकल ड्रामा असल्याने या चित्रपटाची भरपूर चर्चा झाली, मात्र बॉक्स ऑफिसवर चित्रपट फ्लॉप ठरला.त्यानंतर नुकताच १७ मार्चला हा चित्रपट नेटफ्लिक्स या ओटीटी मध्यमावर प्रदर्शित झाला असून ओटीटीवर या चित्रपटाची प्रचंड प्रशंसा होत आहे. अलीकडेच, ‘कांटे’चे दिग्दर्शक संजय गुप्ता यांनी चित्रपटाचे खूप कौतुक केलं. याबद्दल ट्विट करत त्यांनी असं म्हटलं की, “आज मी कंगनाचा ‘इमर्जन्सी’ पाहिला. अगदी स्पष्टपणे सांगायचे तर मला तो पाहायचा नव्हता, कारण याबद्दल माझ्या मनात काही पूर्वग्रह होते. पण, कंगनाचा हा चित्रपट किती छान आहे. अभिनय आणि दिग्दर्शन दोन्ही उत्कृष्ट आहे.”यावर आता कंगनाने प्रतिक्रिया दिली आहे. तसंच तिने चित्रपटसृष्टीवर टीकाही केली आहे. इंडिया टीव्हीशी बोलताना तिने संजय गुप्तांच्या वक्तव्यावर म्हटलं की, “त्यांनी पोस्टमध्ये मान्य केले की, त्यांच्या मनात पूर्वग्रह होते. तुम्ही आधीच मला समजून घेण्यात अपयशी झालेले आहात. माझ्याबद्दल फक्त नकारात्मक विचार करायची आणि मी अपयशी ठरेल अशी इच्छा करायची, मग तुम्हाला कसे कळेल की, मी नक्की काय केले आहे?”यापुढे ती म्हणाली की, “मला वाटतं चित्रपट क्षेत्रातील लोक ज्या प्रकारचे चित्रपट बनवतात ते पाहता, त्यांनी माझ्याबद्दल पूर्वग्रह ठेवू नये. तुम्ही कोणत्या प्रकारचे चित्रपट बनवता हे पाहता माझ्या बुद्धीचा विस्तारित दृष्टिकोन तुम्हाला कसा कळणार? तुमची पात्रता काय आहे?



# सलमान खान व ऐश्वर्या रायच्या नात्याबद्दल ज्येष्ठ सिनेपत्रकाराचा खुलासा

९० च्या दशकात सलमान खान आणि ऐश्वर्या राय यांची जोडी ‘हम दिल दे चुके सनम’ चित्रपटामुळे प्रचंड चर्चेत होती. चित्रपटातील त्यांचा ऑनस्क्रीन रोमान्स चाहत्यांच्या पसंतीस उतरला होता पण, त्यापेक्षाही ऐश्वर्या-सलमानच्या रिअल लाइफ डेटिंगच्या चर्चा सर्वत्र रंगल्या होत्या. हे नातं लग्नापर्यंत टिकू शकलं नाही पण, आजही सलमान-ऐश्वर्याच्या नात्याबद्दल त्यांचे चाहते चर्चा करतात. नुकत्याच ‘मेरी सहेली’च्या पॉडकास्टमध्ये ज्येष्ठ सिनेपत्रकार व लेखक हनीफ झवेरी यांनी सलमान-ऐश्वर्याबद्दल भाष्य केलं आहे. तसेच या दोघांचं ब्रेकअप होण्यामागचं कारण झवेरी यांनी या मुलाखतीत सांगितलं आहे.झवेरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऐश्वर्या आणि सलमान एकमेकांच्या प्रचंड प्रेमात होते. मात्र, अभिनेत्रीचे आई-वडील भाईजानच्या एक्स रिलेशनशिप्समुळे काहीसे नाराज होते. त्याकाळी सलमानचं नाव सोमी अली आणि संगीत





बिजलानी यांच्याबरोबर जोडलं गेलं होतं. त्यामुळे सलमान खान हा ऐश्वर्याच्या प्रेमात नसून दोघांचं रिलेशनशिप नाममात्र आहे असं ऐश्वर्याच्या पालकांना वाटत होतं. यामुळे या दोघांच्या नात्यात तणाव निर्माण झाला होता. अशी माहिती झवेरी यांनी दिली. ते सांगतात, “ऐश्वर्याच्या पालकांना सलमान त्यांच्या लेकीबरोबर फक्त फ्लर्ट करतोय असं वाटत होतं.” दुसरीकडे, सलमानला ऐश्वर्याशी लग्न करून आपलं आयुष्य सेट करायचं होतं पण, अभिनेत्रीला त्यावेळी स्वतःच्या करिअरवर लक्ष केंद्रीत करायचं होतं. यामुळे दोघांमधले वाद वाढले होते. दोघांच्याही वैयक्तिक आयुष्यातील प्राधान्यक्रम त्याकाळी वेगळा होता. मात्र, या सगळ्या वादादरम्यान सलमानने एका रात्री असं काही केलं की, या दोघांचं नातं संपुष्टात आलं.सलमान एके दिवशी रात्री ऐश्वर्याच्या घरी पोहोचला होता. तिच्या घरी अवेळी जाऊन त्याने वाद घातला आणि यामुळेच अभिनेत्रीने रिलेशनशिप संपवण्याचा निर्णय घेतला. याच भांडणात सलमानमुळे ऐश्वर्याला दुखापत झाल्याचं वृत्त सर्वत्र आलं होतं.सलमानला लवकरात लवकर ऐश्वर्याशी लग्न करायचं होतं पण, ऐश्वर्याला तेव्हा स्वतःचं करिअर घडवायचं होतं. यादरम्यान, दोघांमध्ये तणाव निर्माण झाला होता.

# हा नियम काही एका रात्रीत केलेला नाही!

## कोहलीच्या वक्तव्यानंतर बीसीसीआयच्या नियमावर सचिवांचे स्पष्टिकरण

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बीसीसीआयचा खेळाडूंच्या विदेश दौऱ्यांकरता कुटुंबाबाबतचा नियम हा चर्चेचा विषय आहे. विराट कोहलीने आयपीएल २०२५ पूर्वी आरसीबीच्या एका कार्यक्रमात या नियमाबाबत मोठं वक्तव्य केलं. या वक्तव्यानंतर बीसीसीआय निर्णयात बदल करणार असे, रिपोर्ट्स समोर येत होते. पण आता बीसीसीआयचे सचिन देवजीत सैकिया यांनी उत्तर देत नियमात बदल होणार नसल्याचे सांगितले आहे.**



भारतीय क्रिकेट बोर्ड (बीसीसीआय) विदेश दौऱ्यांवर असलेल्या भारतीय खेळाडूंसाठीच्या सध्याच्या नियमांमध्ये बदल करणार नाही, असे सचिव देवजित सैकिया यांनी बुधवार, १९ मार्च रोजी सांगितले. विराट कोहलीने विदेश दौऱ्यांदरम्यान कुटुंबाबातच्या कठोर नियमाबद्दल नाराजी व्यक्त केल्यानंतर सैकिया यांनी हे भाष्य केले आहे.

आयपीएलच्याआधी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूच्या झालेल्या कार्यक्रमात बोलताना कोहली म्हणाला होता की भारतीय संघातील प्रत्येक खेळाडू जेव्हा विदेश दौऱ्यावर असतो तेव्हा त्यांचे कुटुंब त्यांच्याबरोबर असावे असे खेळाडूंना वाटतं. भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर करण्यात आलेल्या बीसीसीआयच्या नियमांवरील प्रश्नावर कोहलीने प्रतिक्रिया दिली होती. कोहलीच्या या वक्तव्याला भारताचे माजी कर्णधार कपिल देव यांनीही पाठिंबा दिला आहे. बीसीसीआयच्या सचिवांनी कोहलीच्या विधानावर प्रतिक्रिया देत सांगितले की क्रिकेट बोर्ड येत्या काळात नियमांमध्ये कोणताही बदल करणार नाही. आयपीएलनंतर भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे, जिथे ते जून ते जुलै दरम्यान ५ कसोटी सामने खेळतील.सध्या हा नियम कायम राहिल, कारण ते देशासाठी आणि आपल्या संस्थेसाठी बीसीसीआयसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे," देवजित सैकिया यांनी क्रिकबझला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. पुढे सचिव म्हणाले, "बीसीसीआयला हे माहित आहे की या नियमामुळे काही जणांमध्ये नाराजी असू शकते किंवा वेगवेगळी मते असू शकतात, कारण लोकशाही व्यवस्थेत लोकांना त्यांचे विचार व्यक्त करण्याचा अधिकार आहे. हा नियम सर्व संघ सदस्यांसाठी म्हणजेच खेळाडू, प्रशिक्षक, व्यवस्थापक, सहाय्यक कर्मचारी आणि सहभागी असलेल्या सर्वांना समान रीतीने लागू होतो आणि सर्वांचे हित लक्षात घेऊन हा नियम लागू केला आहे," असे ते पुढे म्हणाले.

### मागील नियमांमध्ये सुधारणा

४५ दिवसांपेक्षा जास्त दिवसांच्या दौऱ्यात क्रिकेटपटू त्यांच्या कुटुंबासह जास्तीत जास्त १४ दिवस राहू शकतात. ४५ दिवसांपेक्षा कमी कालावधीच्या दौऱ्यांवर, खेळाडू त्यांच्या कुटुंबियांसह जास्तीत जास्त एक आठवडा राहू शकतात.बीसीसीआयच्या सचिवांनी सांगितले की हे नियम भारतीय क्रिकेटमध्ये बऱ्याच काळापासून आहेत. विराट कोहली आणि रवी शास्त्री हे खेळाडू संघाचा भाग असण्यापूर्वी भारतीय क्रिकेटपटूंच्या कुटुंबियांना दौऱ्यावर जाण्याची परवानगी नव्हती हे लक्षात घेणं आवश्यक आहे. जागतिक क्रिकेटमधील बदलत्या काळानुसार या नियमांमध्ये बदल केले आहेत.नवीन नियम हे मागील नियमांमध्ये सुधारणा करून तयार केले आहेत, ज्यामध्ये खेळाडूंच्या सराव सत्रांमधील उपस्थिती, सामन्यांचे वेळापत्रक, दौरे, सामान, संघाच्या हालचाली आणि इतर गोष्टीही त्यात समाविष्ट आहे." असे ते पुढे म्हणाले.

# धोनीचा बिर्याणी प्रकरणारून झाला संताप!

## कॅप्टन कुलच्या रागामुळे CSK ला बदलावं लागलं होतं टीम हॉटेल

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**एम एस धोनी कॅप्टन कूल म्हणून सगळीकडे प्रसिद्ध आहे. क्रिकेटच्या मैदानावर असो किंवा मैदानाबाहेर कायमच शांत स्वभावाचा धोनी सर्वांना माहित आहे. पण काही प्रसंगी हा कॅप्टन कूल संतापला असल्याचे काही किस्से आपण पाहिले आहेत. आयपीएल २०१९ मध्ये राजस्थान रॉयल्स विरुद्धच्या सामन्यादरम्यान नो-बॉलच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी धोनीने मैदानात जाऊन पंचांशी वाद घातला होता, जेव्हा चेन्नईच्या संघाची फलंदाजी सुरू होती. पण आता अजून एक घटना समोर आली आहे.**




ही घटना घरी बनवलेल्या बिर्याणीशी संबंधित आहे. २०१४ मध्ये ही घटना घडली होती. तेव्हा चेन्नई सुपर किंग्सचा संघ कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध चॅम्पियन्स लीग टी-२० सामन्यासाठी हैदराबादमध्ये होते. तत्कालीन बातम्यांनुसार महेंद्रसिंग धोनी एका हॉटेलच्या बाहेरचे जेवण आणण्यास बंदी या धोरणामुळे चांगलाच संतापला होता. धोनी या नियमामुळे इतका संतापला होता की चेन्नई सुपर किंग्ज संघ आयटीसी ग्रँड काकतिया हॉटेलमधून ताज कृष्णा हॉटेलमध्ये गेला होता. अंबाती रायुडूने CSK च्या खेळाडूंसाठी घरी बनवलेली बिर्याणी पाठवली होती.हॉटेलने सुरुवातीला खेळाडूंना त्यांच्या खोलीत बिर्याणी नेण्यास मनाई केल्याचे रिपोर्ट्समध्ये म्हटले आहे. इतर रिपोर्ट्समध्ये असे म्हटले आहे की हॉटेलने खेळाडूंना त्यांच्या खोल्यांमध्ये बिर्याणी नेण्याची परवानगी दिली होती, परंतु खेळाडूंना हॉटेलच्या सार्वजनिक आवारात बिर्याणी खाण्यास मनाई केली होती.त्यावेळी मीडियामधील काही वृत्तांत असे म्हटले होते की भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (BCCI) आणि चेन्नई सुपर किंग्स (CSK) यांनी हॉटेलमध्ये १८० हून अधिक खोल्या बुक केल्या होत्या. या घटनेच्या दुसऱ्या दिवशी, चॅम्पियन्स लीग T20 सामन्यात एमएस धोनीच्या चेन्नई सुपर किंग्जचा कोलकाता नाईट रायडर्सकडून तीन विकेट्सनी पराभव झाला, पण किमान खेळाडूंनी घरी बनवलेल्या बिर्याणीचा आस्वाद घेतला होता.चेन्नई सुपर किंग्ज (CSK) ही IPL मधील सर्वात यशस्वी फ्रँचायझींपैकी एक आहे.

### कॅप्टन कूल संतापला

आयपीएलची पाच विजेतेपद पटकावली आहेत. सीएसके मुंबई इंडियन्ससह, सर्वाधिक आयपीएल ट्रॉफी जिंकणारा संघ आहे. मुंबई इंडियन्स हा ५ आयपीएल विजेतेपद जिंकणारा पहिला संघ आहे. आयपीएल २०२५ मधील पहिला सामना कोलकाता नाईट रायडर्स विरूद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात कोलकाता येथील ईडन गार्डन्स मैदानावर खेळवला जाणार आहे.एम एस धोनी कॅप्टन कूल म्हणून सगळीकडे प्रसिद्ध आहे. क्रिकेटच्या मैदानावर असो किंवा मैदानाबाहेर कायमच शांत स्वभावाचा धोनी सर्वांना माहित आहे. पण काही प्रसंगी हा कॅप्टन कूल संतापला असल्याचे काही किस्से आपण पाहिले आहेत.

आयपीएल २०१९ मध्ये राजस्थान रॉयल्स विरुद्धच्या सामन्यादरम्यान नो-बॉलच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी धोनीने मैदानात जाऊन पंचांशी वाद घातला होता, जेव्हा चेन्नईच्या संघाची फलंदाजी सुरू होती. पण आता अजून एक घटना समोर आली आहे.ही घटना घरी बनवलेल्या बिर्याणीशी संबंधित आहे. २०१४ मध्ये ही घटना घडली होतीधोनी या नियमामुळे इतका संतापला होता की चेन्नई सुपर किंग्ज संघ आयटीसी ग्रँड काकतिया हॉटेलमधून ताज कृष्णा हॉटेलमध्ये गेला होता.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। गुरुवार।
। दि. 20 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# हिंजवडी आयटी पार्कमध्ये कामगारांची बस पेटली

## चार कामगारांचा होरपळून मृत्यु; चालकासह सहा कामगार जखमी : दोघांची प्रकृती चिंताजनक

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हिंजवडी आयटी पार्कमधील व्योम ग्राफिक्स या कंपनीतील कामगारांना वारजे माळवाडी येथून घेऊन येणाऱ्या टेम्पो ट्रॅव्हल्स बसला अचानक आग लागून झालेल्या दुर्घटनेत चार कामगारांचा होरपळून मृत्यु झाला. आग एवढी भीषण होती की चारही कामगारांना बसमधून बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही आणि चौघांचाही अक्षरश: कोळसा झाला. या घटनेत सहा कामगार जखमी झाले. दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. एका महिलेसह 4 कामगारांनी प्रसंगावधान राखत बसमधून उडी मारल्याने ते सुखरूप बचावले.**






ही घटना बुधवारी (दि.१९) सकाळी पावणेआठच्या सुमारास हिंजवडी आयटी पार्कमध्ये विप्रो सर्कलजवळ घडली. शंकर कोंडीबा शिंदे (वय ६३, रा. नऱ्हे आंबेगाव), गुरुदास खंडू लोखरे (वय ४०, रा. हनुमाननगर, पौड फाटा) सुभाष सुरेश भोसले (वय ४५, रा. त्रिलोक सोसायटी, वारजे माळवाडी), राजेंद्र सिद्धार्थ चव्हाण (वय ४२, रा. सिंहगड रोड, वडगाव बुद्रूक) अशी मृत्युमुखी पडलेल्या चार कामगारांची नावे आहेत.

तर, बसचालक जनार्दन हंबर्डीकर, विश्वास खानविलकर, चंद्रकांत मलजी, प्रविण निकम, संदिप शिंदे, विश्वास जोरी हे चार कामगार जखमी असून त्यांच्यावर हिंजवडीतील रूबी हॉल रूग्णालयात उपचार सुरू आहेत. हिंजवडी आयटी पार्कमधील फेज - २ मध्ये व्योम ग्राफीक्स या नावाने प्रिटींग प्रेस कंपनी आहे. सर्व कामगार या कंपनीत कामाला आहेत. कंपनीत सकाळ आणि दुपार अशा दोन पाळीत काम चालते. सकाळच्या पाळीत आठ ते साडेचार अशी कामाची वेळ आहे. कंपनीतर्फेÂ कामगारांची ने-आण करण्यासाठी बसची सोय आहे. बसचालक हंबर्डीकर हे दररोज सकाळी साडेसहा वाजता वारजे माळवाडी येथून कामगारांना बसमध्ये घेतात आणि पावणेआठला बस कंपनीत पोहोचते. बुधवारी सकाळी हंबर्डीकर यांनी नेहमीप्रमाणे वारजे येथून १२ कामगारांना घेतले. चांदणी चौकात साडेसात वाजता एका कामगाराला घेतले. कामगारांना घेऊन बस हिंजवडी येथे विप्रो सर्कल चौकाजवळ आली असता अचानक बसच्या पुढील भागातून धूर येऊ लागला. काही कळायच्या आत आग लागली. चालकाच्या पायाला भाजल्याने त्याने त्वरीत उडी मारली. बस रस्तादुभाजकाला जाऊन धडकून थांबली. काही क्षणात आगीने बसला वेढा घातला.

### बसच्या दरवाजातून उडी मारल्याने बचावले

जखमींपैकी दोन जण ४० टक्क्यांहून अधिक भाजले असून त्यांची प्रकृती गंभीर आहे. एक कामगार २० टक्के, तर एक जण ५ टक्के भाजला असून एक कामगार किरकोळ भाजला असून त्याची प्रकृती स्थीर आहे. तसेच, विश्वास गोडसे, मंजिरी आडकर, विठ्ठल दिघे, प्रदीप राऊत यांनी प्रसंगावधान राखत बसच्या दरवाजातून उडी मारल्याने ते बचावले.




Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
Powered by
JAI HIND EDUTECH
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241

# नागरिकांच्या भेटीच्या वेळी गायब होणाऱ्या 34 अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवटीत नागरिक अनेक विभागांत कामे घेऊन येतात. मात्र, विभागातील अधिकारी जागेवर नसल्याने भेटत नव्हते. त्यामुळे आयुक्त शेखर सिंह यांनी नागरिकांना भेटण्यासाठी अधिकारी उपलब्ध व्हावेत, यासाठी वेळ ठरवून दिली. मात्र, आता या भेटीच्या वेळेत बहुतांशी अधिकारी कार्यालयात नसतात. याबाबत आयुक्तांनी सामान्य प्रशासन विभागाकडून अहवाल मागितला असून, भेटीच्या वेळी वारंवार अनुपस्थित राहणाऱ्या ३४ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश दिले आहेत.**



महापालिकेचे कार्यालयीन कामकाज सकाळी १० ते सायंकाळी पावणेसहापर्यंत सुरू असते. या वेळेत विविध कामानिमित्त नागरिक महापालिकेच्या विविध कार्यालयांत, विविध अधिकाऱ्यांकडे येत असतात परंतु, अधिकारी कार्यालयात गैरहजर असल्याने त्यांना भेटण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागतात. अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून ते साईटवर, बैठकीला किंवा कार्यक्रमाला असल्याचे कारण दिले जाते. याबाबत वारंवार तक्रारींमुळे आयुक्त सिंह यांनी नागरिकांना भेटण्यासाठी सोमवार, बुधवार आणि शुक्रवार हे तीन दिवस दुपारी ३ ते सायंकाळी ६ ही वेळ निश्चित केली. त्यानुसार कार्यालयात नागरिकांसाठी उपलब्ध राहण्याचे निर्देश दिले.

### हे अधिकारी गैरहजर होते..

पथकाने केलेल्या दहा दिवसांच्या तपासणीत सर्वाधिक चार दिवस लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, सहायक आयुक्त अमित पंडित गैरहजर आढळून आले. नंतर अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता बाबासाहेब गलबले, सहायक आयुक्त तानाजी नरळे, उमेश ढाकणे, महेश वाघमोडे हे तीन दिवस जागेवर नव्हते. तर अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी नीळकंठ पोमण, नगररचना उपसंचालक प्रसाद गायकवाड, उपायुक्त मनोज लोणकर, सचिन पवार, पंकज पाटील, अण्णा बोदडे, सीताराम बहुरे, राजेश आगळे, प्रदीप ठेंगल, सहशहर अभियंता संजय खाबडे, लक्ष्मण गोफणे, अविनाश शिंदे, शीतल वाकडे, अजिंक्य येळे, विजय थोरात, मुकेश कोळप, सुचिना पानसरे, श्रीकांत कोळप, किशोर ननवरे,शशिकांत पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे यांचाही एक-दोन वेळा भेटण्याच्या वेळी उपस्थित न राहणाऱ्यांमध्ये समावेश आहे.



# 24 आणि 25 मार्चला चिंचवडमधील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

'मराठी चित्रपट संवर्धन आणि प्रदर्शनास चालना' या बहूउद्देशीय संकल्पनेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि मराठी चित्रपट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नाट्यगृहात चित्रपट संकल्पने अंतर्गत मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले आहे. २४ मार्च ते २५ मार्च २०२५ याकाळात पिंपरी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे पोस्टर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते आज बुधवारी (१९ मार्च) प्रकाशित करण्यात आले. याप्रसंगी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उप आयुक्त पंकज पाटील, उप आयुक्त आण्णा बोदडे, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्य लिपिक देवेंद्र मोरे, मराठी चित्रपट असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश सरचिटणीस कौस्तुभ कुलकर्णी उपस्थित होते. मराठी चित्रपट महोत्सवामध्ये 'मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी', 'इलू इलू', 'मुक्काम पोस्ट देवाचं घर', 'चिकी चिकी बुबूमबूम', 'श्यामची आई', 'संगीत मानापमान' असे विविध चित्रपट दाखवण्यात येणार आहे. या चित्रपटांची निवड विद्यार्थी, तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच स्तरातील प्रेक्षकांचा विचार करून करण्यात आली आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या चित्रपट महोत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## "तिकिटाची किंमत नाममात्र"

मराठी चित्रपट महोत्सवामध्ये दाखवण्यात येणारे चित्रपट हे नुकतेच प्रदर्शित झाले आहेत. महोत्सवामध्ये या चित्रपटासाठी नाममात्र ५० रुपये तिकीट ठेवण्यात आले आहे. हे तिकीट ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने खरेदी करता येणार आहे. ऑनलाइन तिकीट खरेदी TICKETKHIDAKEE.COM या संकेतस्थळावर करता येईल. तसेच प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथेही २१ मार्च २०२५ पासून तिकीट विक्री सुरू करण्यात येणार आहे. याशिवाय प्रेक्षकांना ७८९७८९७२४७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करून तिकीट बुक करता येईल.